17 JAN 2024

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


# परिक्षेत्रात स्कूल कनेक्ट अभियान यशस्वी करा

## कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के; शिवाजी विद्यापीठात कार्यशाळा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीमुळे होणाऱ्या विद्यार्थी उपयोगी शैक्षणिक बदलांबाबत विद्यार्थ्यांना माहिती उपलब्ध करून देण्याच्या अनुषंगाने स्कूल कनेक्ट संपर्क अभियान आयोजित केले आहे. हे अभियान शिवाजी विद्यापीठ परिक्षेत्रात यशस्वी करावे, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

विद्यापीठ अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षातर्फे संलग्नित महाविद्यालयांच्या समन्वयकांसाठी स्कूल कनेक्ट अभियानविषयक प्रशिक्षण कार्यशाळेत अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, पुढील शैक्षणिक वर्षापासून अकृषी विद्यापीठांशी संलग्नित सर्व महाविद्यालयांमध्ये नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी पदवी अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्षासाठी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्षासाठी होणार आहे. या बदलांचा सर्वाधिक परिणाम शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये कनिष्ठ महाविद्यालयांतून १२ वीमध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांवर होणार आहे. त्या दृष्टीने शासनाने स्कूल कनेक्ट अभियान हाती घेतले आहे. ते यशस्वी करणे ही शैक्षणिक क्षेत्रातील प्रत्येक घटकाची जबाबदारी आहे.



**कोल्हापूर : स्कूल कनेक्ट अभियान कार्यशाळेत मार्गदर्शन करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत डॉ. महादेव देशमुख, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. सरिता ठकार आदी. (छाया : पप्पू अत्तार)**

प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील म्हणाले, नूतन शैक्षणिक धोरणामध्ये पारंपरिक शिक्षण पद्धतीच्या तुलनेत आमूलाग्र बदल केले आहेत. ते विद्यार्थ्यांपर्यंत, त्यांच्या पालकांपर्यंत वेळेत पोहोचविणे गरजेचे आहे. मानव्यशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख यांनी स्कूल कनेक्ट (एनईपी कनेक्ट) अभियानाची माहिती दिली. विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेच्या अधिष्ठाता डॉ. सरिता ठकार आणि वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी अभियानाची अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण सूचना केल्या. उपकुलसचिव डॉ. उत्तम सकट यांनी कार्यक्रमाचे संचालन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 JAN 2024
सकाळ

# शैक्षणिक बदलांची माहिती विद्यार्थ्यांना प्रभावीपणे द्या

## डॉ. शिर्के; स्कूल कनेक्ट प्रशिक्षण

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १६ : 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीमुळे होणाऱ्या शैक्षणिक बदलांची माहिती विद्यार्थ्यांना प्रभावीपणे द्या. त्याबाबतचे स्कूल कनेक्ट संपर्क अभियान शिवाजी विद्यापीठ परिक्षेत्रात यशस्वी करा,' असे आवाहन कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी येथे केले.

राज्य शासनाने महाराष्ट्रातील महाविद्यालयांमधील स्थूल नोंदणी प्रमाण वाढविण्यासाठी आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामुळे होणाऱ्या शैक्षणिक बदलांबाबत व त्यांच्या सकारात्मक परिणामांची माहिती देण्यासाठी स्कूल कनेक्ट अभियान सुरू केले आहे. त्याचे आयोजन आज विद्यापीठाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षातर्फे करण्यात आले. त्यात कुलगुरू डॉ. शिर्के यांनी मार्गदर्शन केले. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील प्रमुख उपस्थित होते.

डॉ. शिर्के म्हणाले, 'शैक्षणिक बदलांचा सर्वाधिक परिणाम इयत्ता बारावीमधील विद्यार्थ्यांवर होणार आहे. बारावीमध्ये शिकत असलेल्या विद्यार्थ्यांपैकी अनेक विद्यार्थी विविध अडचणींमुळे उच्च शिक्षणापासून दूर जात आहेत. अशा विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची संधी उपलब्ध करुन देताना विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयांमध्ये उपलब्ध ऑनलाईन अभ्यासक्रमांबाबतची माहिती त्यांच्यापर्यंत पोहोचवून स्थूल नोंदणी प्रमाण वाढविणे आवश्यक आहे. यावेळी डॉ. महादेव देशमुख यांनी 'स्कूल कनेक्ट'चे सादरीकरण दिले. डॉ. सरिता ठकार, श्रीकृष्ण महाजन यांनी सूचना केल्या. डॉ. उत्तम सकट यांनी या कार्यक्रमाचे नियोजन केले.

### विद्यार्थ्यांसमोर आकलन मांडा

प्र-कुलगुरू डॉ. पाटील म्हणाले, 'या शैक्षणिक बदलांबाबत विद्यापीठ प्रशासन महाविद्यालयीन समन्वयकांना पॉवर पॉईंट सादरीकरण तयार करून देत आहे. त्यातील विषयांच्या अनुषंगाने स्वयंअध्ययन करून त्याचे आकलन विद्यार्थ्यांसमोर मांडावे.'

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 JAN 2024
पुढारी

# शिवाजी विद्यापीठात आज 'मोडी लिपी प्रचार व प्रसार' विषयावर कार्यशाळा

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवराज्याभिषेकाच्या ३५० व्या वर्षानिमित्त इतिहास अधिविभाग, छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास अध्ययन केंद्र, छत्रपती संभाजी महाराज संशोधन केंद्र, शिवाजी विद्यापीठ आणि पुराभिलेख संचालनालय, महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवार, दि. १७ रोजी 'मोडी लिपी प्रचार व प्रसार' विषयावर कार्यशाळेचे आयोजन केले आहे. यात मनोज राजपूत, अमोल महल्ले, पंकज पाटील (पुराभिलेख संचालनालय, मुंबई), गणेश खोडके (कोल्हापूर पुराभिलेखागार) हे मार्गदर्शन करणार आहेत. अध्यक्षस्थानी इतिहास विभागप्रमुख डॉ. अवनिश पाटील असणार आहेत. यावेळी डॉ. नीलांबरी जगताप यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे, अशी माहिती समन्वयक डॉ. दत्तात्रय मचाले यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 JAN 2024
तरुण भारत

# मोडी लिपीवर आज कार्यशाळा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास अधिविभागात छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास अध्ययन केंद्र, छत्रपती संभाजी महाराज संशोधन केंद्र, पुराभिलेख संचालनालय यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवार १७ रोजी 'मोडी लिपी प्रचार व प्रसार' विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन केले आहे. कार्यशाळेत मनोज राजपूत, अमोल महल्ले, पंकज पाटील (पुराभिलेख संचालनालय, मुंबई), गणेश खोडके (कोल्हापूर पुराभिलेखागार, कोल्हापूर) हे मार्गदर्शन करणार आहेत. अध्यक्षस्थानी इतिहास विभागाचे विभागप्रमुख डॉ. अवनीश पाटील तर डॉ. नीलांबरी जगताप यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. कार्यशाळेस इतिहास प्रेमी व मोडी अभ्यासकांनी उपस्थित रहावे, असे आवाहन समन्वयक डॉ. दत्तात्रय मचाले यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 JAN 2024
सकाळ

# 'मोडी लिपी'वर आज कार्यशाळा


कोल्हापूर : शिवराज्याभिषेकाच्या ३५० व्या वर्षानिमित्त शिवाजी विद्यापीठातील इतिहास अधिविभाग, छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास अध्ययन केंद्र, छत्रपती संभाजी महाराज संशोधन केंद्र आणि पुराभिलेख संचालनालयातर्फे बुधवारी (ता.१७) 'मोडी लिपी प्रचार व प्रसार' या विषयावर कार्यशाळा होणार आहे. विद्यापीठाच्या इतिहास विभागातील या कार्यशाळेत मनोज राजपूत, अमोल महल्ले, पंकज पाटील, गणेश खोडके मार्गदर्शन करणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 JAN 2024
लोकमत

# शिवाजी विद्यापीठात गीतलेखन कार्यशाळा

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या



संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागात प्रसिद्ध कवी, गीतकार बाबासाहेब सौदागर यांची 'गीतलेखन' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा झाली.

या क्षेत्रात काम करण्यासाठी करावा लागलेला संघर्ष, कलाक्षेत्रातील अनुभवांचा प्रवास सौदागर यांनी सहजतेने उलगडला. बालपणापासून ग्रामीण भागातील लोककवितांचा केलेला अभ्यास, कवितेच्या अभ्यासाची आवड ही जीवनामध्ये आव्हानात्मक प्रसंगी गीतलेखन करताना कशी उपयोगी पडली हे सांगत असताना त्यांनी काव्यलेखन, गीतलेखनाची प्रक्रिया विद्यार्थ्यांसमोर सुगमतेने उलगडली. डॉ. विनोद ठाकूरदेसाई यांनी प्रास्ताविक केले. विभागप्रमुख डॉ. निखिल भगत यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. अतुल परीट यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 JAN 2024
पुण्यनगरी

# विद्यापीठात गीतलेखन कार्यशाळा उत्साहात

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात गीतलेखन कार्यशाळा उत्साहात झाली. गीतकार बाबासाहेब सौदागर यांनी गीतलेखना विषयी मार्गदर्शन केले. विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागात झालेल्या कार्यशाळेचे प्रास्ताविक डॉ. विनोद ठाकूरदेसाई यांनी केले. विभागप्रमुख डॉ. निखिल भगत यांनी स्वागत केले. अतुल परीट यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 JAN 2024
लोकमत

# नाझ सिद्दीकी वक्तृत्व स्पर्धेत प्रथम



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनाच्या वतीने मराठी पत्रकार दिनानिमित्त आयोजित वक्तृत्व स्पर्धेत नाझ सिद्दीकी हिने प्रथम क्रमांक पटकावला. गौतमी शिकलगार आणि राधिका शर्मा यांनी अनुक्रमे द्वितीय व तृतीय क्रमांक मिळविला.

नाईट कॉलेजच्या मराठी विभागाचे प्रमुख डॉ. अरुण शिंदे आणि सांगली आकाशवाणीचे प्रसारण अधिकारी डॉ. दीपक ठमके यांनी परीक्षण केले. डॉ. शिवाजी जाधव यांनी प्रास्ताविक केले. ऋषिकेश पाटील याने सूत्रसंचालन केले. साजिद शेख याने आभार मानले. यावेळी डॉ. सुमेधा साळुंखे, डॉ. प्रसाद ठाकूर, जयप्रकाश पाटील, आनंदा पांढरबळे आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 JAN 2024
सकाळ

# संत तुकारामांची चित्रप्रतिमा कालानुरूप बदलली : हांडे

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १६ : 'संत तुकारामांची चित्रप्रतिमा काळानुरूप बदलत गेली,' असे प्रतिपादन जागतिक कीर्तीचे चित्रकार भास्कर हांडे यांनी केले. शिवाजी विद्यापीठातील संत तुकाराम अध्यासनातर्फे आयोजित व्याख्यानामध्ये त्यांनी विचार मांडले. अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. रणधीर शिंदे होते.

हांडे म्हणाले, 'तुकारामांच्या वेगवेगळ्या काळातील चित्रप्रतिमांवर सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक आणि भौगोलिक घटनांचा परिणाम झालेला दिसून येतो. वेगवेगळ्या काळातील लोकमानसाच्या मनात असणाऱ्या तुकारामांच्या चित्रप्रतिमा त्या-त्या काळातील कलावंतांनी निर्माण केल्या'. डॉ. शिंदे म्हणाले, 'संत तुकाराम यांच्या चित्रप्रतिमेला बहुअयामी असे अनेक पदर आहेत. त्यामुळे तुकारामांची चित्रप्रतिमा वेगवेगळी दिसते. यासाठी मुळापर्यंत जाऊन विचार केला पाहिजे.' कार्यक्रमास डॉ. प्रभंजन माने, राजशेखर शिंदे, गोरख थोरात उपस्थित होते. अध्यासनाचे समन्वयक डॉ. नंदकुमार मोरे यांनी स्वागत केले. सुस्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. सुखदेव एकल यांनी आभार मानले.

17 JAN 2024 तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठ संघाने पटकावले सर्वसाधारण जेतेपद

## राज्य आंतरविद्यापीठ ॲथलेटिक्स स्पर्धेत नेत्रदीपक कामगिरी : रिले प्रकारात पुरुष संघ वेगवान, महिला संघाची सरशी

प्रतिनिधी
कोल्हापूर

रौप्यमहोत्सवी महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठ क्रीडा महोत्सवाअंतर्गत नागपुरात आयोजित केलेल्या ॲथलेटिक्स स्पर्धेतील विविध क्रीडा प्रकारात शिवाजी विद्यापीठाच्या पुरुष व महिला संघाने पदकांची लयलुट करत सर्वसाधारण विजेतेपद हस्तगत केले. स्पर्धेत ७१ गुणांची कमाई केलेल्या पुरुष संघाचे हे सलग दुसरे सर्वसाधारण विजेतेपद ठरले आहे. इतकेच नव्हे तर रिले प्रकारातही राज्यातील विद्यापीठांमध्ये वेगवान संघ म्हणून शिवाजी विद्यापीठाचा पुरुष संघाने वर्चस्व राखले. महिला संघानेही शानदार कामगिरीसह ५२ गुणांची कमाई करत सर्वसाधारण विजेतेपदावर कब्जा केला आहे.





नागपूर : राज्य आंतरविद्यापीठ क्रीडा महोत्सवाअंतर्गत आयोजित केलेल्या ॲथलेटिक्स स्पर्धेत पदकांची लयलुट केलेल्या शिवाजी विद्यापीठाच्या पुरुष व महिला संघाला चषक देऊन गौरवण्यात आले.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठाच्या (नागपूर) वतीने आपल्या प्रशस्त मैदानात ॲथलेटिक्स स्पर्धेअंतर्गत विविध क्रीडा स्पर्धाचे आयोजन केले होते. या स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या पुरुष व महिला संघाने १८ सुवर्ण, ९ रौप्य व ५ कांस्यपदकांची कमाई केली. या दोन्हीही संघांना विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, क्रीडा विभागाचे क्रीडा व शारिरिक शिक्षण संचालक डॉ. शरद बनसोडे, पथक प्रमुख डॉ. सुनील चव्हाण व संघ प्रशिक्षक प्रा. बाळासाहेब भोसले, सविता भोसले, राजेंद्र रायकर, एन. डी. पाटील, संजय पाटील व सचिन पाटील यांचे मार्गदर्शन मिळाले.

### स्पर्धेतील शिवाजी विद्यापीठाची कामगिरी :

**महिला संघ :**

तीतिक्षा पाटोळे : ४०० व २०० मीटर धावणे– प्रत्येकी कांस्यपदक
पूर्वा शेवाळे : १५०० मीटर धावणे–कांस्य पदक
निकिता शेवाळे : थाळी फेक–रौप्य पदक
संपदा ढमाळ : तिहेरी उडी–सुवर्ण, लांब उडी–कांस्य पदक
महिलांची ४ बाय ४०० मीटर रिले : रौप्य पदक (संघातील धावपटू–लीना कोहळे, स्वराली मोहिते, श्रेया जाधव, तीतिक्षा पाटोळे, आश्लेषा मांगले)
महिलांची ४ बाय १०० मीटर रिले : सुवर्ण पदक (संघातील धावपटू–लीना कोहळे, स्वराली मोहिते, रितिका मगदूम, तीतिक्षा पाटोळे, अनुष्का शिर्के

**पुरुष संघ :**

प्रफुल्ल थोरात : गोळाफेक–सुवर्ण, थाळी फेक–रौप्य पदक
धैर्यशील : उंच उडी–सुवर्ण पदक
अथर्व धज : उंच उडी–रौप्य पदक
ओमकार कुमार : ८०० व १५०० मीटर धावणे–प्रत्येकी रौप्य पदक
अंकुश हाक्के : ५ हजार मीटर धावणे– कांस्य पदक
ऋषिकेश बागडे : ४०० मीटर धावणे : कांस्य पदक
अजय खडे : १०० व २०० मीटर धावणे–प्रत्येकी कांस्य पदक
पुरुषांची ४ बाय ४०० मीटर रिले : सुवर्ण पदक (संघातील धावपटू–अजय खाडे, सार्थक शेलार, सत्यजित पुजारी, ऋषिकेश बगाडे, अखिलेश खोत,
पुरुषांची ४ बाय १०० मीटर रिले : सुवर्ण पदक (संघातील धावपटू–अजय खाडे, सार्थक शेलार, सत्यजित पुजारी, ऋषिकेश बगाडे, अखिलेश खोत)

जनसंपर्क कक्ष
17 JAN 2024
सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाची बाजी

## आविष्कार संशोधन : पहिल्यांदाच सर्वसाधारण विजेतपद

कोल्हापूर, ता. १६ : नाशिक येथील आरोग्य विज्ञान विद्यापीठात १२ ते १५ जानेवारीदरम्यान झालेल्या राज्यस्तरीय आंतरविद्यापीठ आविष्कार संशोधन स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या संघाने बाजी मारली. या संघाच्या माध्यमातून विद्यापीठाला पहिल्यांदाच प्युअर सायन्स कॅटेगरीमध्ये सर्वसाधारण विजेतपदाचा 'सुंदरबल प्युअर सायन्स' फिरता चषक मिळाला.

या स्पर्धेत प्युअर सायन्स कॅटगरीमध्ये (युजी) न्यू कॉलेजच्या मुनिफ अन्सारी या विद्यार्थ्याने प्रथम क्रमांक पटकविला. त्याला ३५ हजार रुपयांची शिष्यवृत्ती मिळाली आहे. मानवता, भाषा, ललित कला (युजी) गटामध्ये कला व वाणिज्य महाविद्यालय नागठाणेमधील विद्यार्थिनी तन्वी तानाजी जाधवने तृतीय क्रमांक मिळविला. विद्यापीठाच्या ५० जणांचा संघ या स्पर्धेत सहभागी झाला. त्यात पदवी, पदव्युत्तर व पदव्युत्तर पदवी या तीन स्तरांतून विद्यापीठस्तरीय आविष्कार संशोधन स्पर्धेमध्ये, मानव्यशास्त्र शाखा, वाणिज्य व्यवस्थापन व विधी शाखा, विज्ञान व तंत्रज्ञान शाखा, मेडिसिन व फॉर्मसी शाखा, शेती व पशुसंवर्धन शाखा, अभियांत्रिकी व तंत्रज्ञान शाखा अशा एकूण सहा शाखांमधून प्रावीण्य मिळवलेले ४५ विद्यार्थी, डॉ. सिध्देश्वर जाधव, कविता गजरे, समन्वयक डॉ. पंकज पवार, विजय इंगवले, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. पी. टी. गायकवाड यांचा समावेश होता.



कोल्हापूर : आंतरविद्यापीठ अविष्कार संशोधन स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या संघाने बाजी मारली.

जनसंपर्क कक्ष
17 JAN 2024
पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : महाराष्ट्र राज्य क्रीडा महोत्सवात अ‍ॅथलेटिक्समध्ये चॅम्पियनशिप मिळविलेल्या शिवाजी विद्यापीठाच्या खेळाडूंसमवेत मार्गदर्शक शिक्षक.

# शिवाजी विद्यापीठास अ‍ॅथलेटिक्स चॅम्पियनशिप

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाने महाराष्ट्र राज्य क्रीडा महोत्सवात अ‍ॅथलेटिक्समध्ये नेत्रदीपक कामगिरी करून चॅम्पियनशिप मिळवली.

नागपूर येथे सुरू असलेल्या क्रीडा महोत्सवात रिले प्रकारात महाराष्ट्रातील वेगवान संघ ठरला. अ‍ॅथलेटिक्स स्पर्धेची पुरुष जनरल चॅम्पियनशिप उपविजेतेपद सावित्रीबाई फुले विद्यापीठ पुणे संघाचे ५५ गुण तर विजेता संघ शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर संघाने ७१ गुण मिळविले.

## महाराष्ट्र राज्य क्रीडा महोत्सव उत्साहात

महिला संघामध्ये शिवाजी विद्यापीठाने ५३ गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ नागपूर ४५ गुणासह द्वितीय क्रमांकावर राहिले. ओव्हर ऑल जनरल चॅम्पियनशिपमध्ये शिवाजी विद्यापीठ १२४ गुणांसह अव्वल ठरले. सावित्रीबाई फुले विद्यापीठ पुणे ९६ गुण घेऊन दुसरा क्रमांक मिळवला. विद्यापीठ अ‍ॅथलेटिक्स संघाचे प्रमुख मार्गदर्शक प्रा. बाळासाहेब भोसले, (मुले), डॉ. सविता भोसले (मुली), कंटिजेंट लीडर डॉ. सुनील चव्हाण, प्रा. डॉ. राजेंद्र रायकर, प्रा. डॉ. एन.डी. पाटील यांचे खेळाडूंना मार्गदर्शन लाभले.

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक डॉ. शरद बनसोडे यांनी यशस्वी संघातील खेळाडूंचे अभिनंदन केले.